"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 03, Issue: 02, Mar.-Apr. 2016 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (IIFS) - 0.776

# पुस्तक आपल्याला पंख देतात

**सुरेखा राजेंद्र खरे**

सहायक ग्रंथपाल

नेस वाडिया महाविदयालय

पुणे, महाराष्ट्र, भारत.

पुस्तकंआपल्याला पंख देतात, लायब्ररी ऑफ कॉंग्रेस यांची घोषणा म्हणजे पुस्तकांचे आपल्या जीवनातील अतिशय महत्वाचे स्थान. आजच्या घडीला माणसाकडे असणारे ज्ञान म्हणजे त्याची मोठी शक्ती आणि ज्ञान जर वाढवायचे असेल तर वाचन गरजेचे आहे. पुस्तकं आपल्याला जगण्याची नवी दिशा दाखवतात. मुलांची वाचनाची आवड दिवसे दिवस कमी होत चालली आहे अस आपण म्हणतो पण खरचं ती कमी होतेय का ?याचा एक अभ्यास म्हणुन मुलांकडुन प्रश्नावली भरुन घेतली त्यात असे दिसुन आले की मुलांचे वाचन खरचं कमी होत चालले आहे त्यास अनेक कारणे आहेत. आज टी. व्ही.,केबल, इंटरनेट आणि अशी अनेक प्रलोभने मुलांसमोर असतात वाचन करायला वेळच होत नाही अशी बरीच कारणेपुढे आली. शाळेतील २५ मुलांपैकी ५ मुले रोज अवांतर वाचन करतात. तर महाविद्यालयातील ५८ मुलांपैकी ४० मुलांना वाचन करायला आवडते. पणत्यापैकी २३मुलेच रोज वाचतात. २ मुले ही ऑडीओ पुस्तकेऐकतात. वाचनामुळे कल्पनाशक्ती वाढते, सामाजिक बांधिलकी याची जाण येते. खरतरंआज माणसामध्ये संवेदनशील मनाचा भाग कमी बघायला मिळतो. दुसऱ्याच्या दुःखाची , समाजिक जाणिव कमी आणि आपला स्वतःचा स्वार्थ हाजास्त बघावयास मिळतो. वाचनाचे महत्व सगळयांनाच माहिती असुनही आजची आपली जीवन पध्दती बदलल्यामुळे आपण त्याकडे दुर्लक्ष करतो.रा.चि. ढेरे म्हणतात 'माणसाच्या अन्न, वस्त्र, निवारा या जशा प्राथमिक गंरजा आहेत तसेच आत्माची गरज म्हणजे वाचन'. अलिकडच्या धकाधकीच्या जीवनात स्वतःला वेळ देता येत नाही तिथे वाचन कधी करणार असे नाराजीचे सुर नेहमीच ऐकायला मिळतात. पण जिथे आवड असते तेथे सवड मिळण्यास हरकत नाही असे म्हणावयास हरकत नाही. वाचन समृध्द असेल तर लेखनही समृध्द होते.डॉ. बाबासाहेब आबेंडकर दिवसातले १८ तास वाचन करायचे. भारतातील कोणत्याही राजकीय नत्याने केले नाही एवढे प्रचंड लेखन त्यांनी केलेले आहे. डॉ. अब्दुल कलाम म्हणतात, माझं ग्रंथ सग्रंहालय ही माझी सगळयात मोठी मौल्यवान ठेव

आहे . आणि पुस्तकांसोबत ज्ञानाबरोबर मला आनंदही मिळाला आहे. शैक्षणिक जीवनात अवांतर वाचनाची नितांत गरज आहे. त्यामुळे विदयार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होण्यास मदतच होते. या सर्वेक्षणामध्ये असे दिसुन आले १२ ते १८ या वयोगटातील मुलांमध्ये मुलींपेक्षा वाचन कमी आहे या मागील कारण असे दिसुन आले की मुले खेळण्यासाठी घराबाहेर जास्त असतात पण वयात आल्यानंतर घरात बसण्याशिवाय मुलीनां पर्याय नसतो म्हणुन त्या वाचन करतात. आजची पिढीही जास्तीत जास्त इंग्रजी माध्यमात शिकत असली तरीही मातृभाषेत शिक्षण घेणाऱ्या मुलांमध्येही वाचनाचे प्रमाण कमीच जाणवते. कारण मोबाईल, इंटरनेट, टी. व्ही. यांचे आकर्षण वाढलेले दिसते. मोबाईल आणि इंटरनेटच्या जगात वावरतानाही ई बुक्स् फार वाचली जातात असे नाही. मुलांना आपण फक्त वाचा असे सांगतो पण काय वाचावे हे मात्र सांगायचे विसरतो. संत कबीर, गौतम बुदध, महात्मा फुले, डॉ. आबेडकर, संत तुकाराम, छत्रपती शाहु महाराज, शिवाजी महाराज, अशा अनेक महापुरषांची चरित्रे तसेच साने गुरुजी, डॉ. अब्दुल कलाम, रविंद्रनाथ टागोर यांच्या साहित्यातुन मुलांना विचार आणि प्रेरणाच मिळेल. वाचन कमी झाले असे न म्हणता काय वाचले पाहिजे हे या पिढीला नीट समजावले पाहिजे. ई मेल वाचले जातात, नेटवरुन इतर माहिती वाचली जाते, मोबाईलवर व्हॉटस ॲपव्दारा माहिती वाचली जाते, पण इतर अवांतर पुस्तके वाचण्याकडचा आपला कल कमी दिसतो. जर टीव्ही, मोबाईल, इंटरनेटमुळे समाज मनावर परिणाम होत असेल तर नक्कीच वाचनाने त्यांच्या जाणिवेवर परिणाम होईल. वाचन संस्कृती जोपासण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालये करत असतात. सार्वजनिक ग्रंथालयाची चळवळ सयाजीराव गायकवाड यांनी बडोदयात सुरू केली. आज सार्व जनिक ग्रंथालयाची संख्या वाढलेली दिसते. पण एखादे दुसरे सार्वजनिक ग्रंथालय सोडले तर इतर सार्वजनिक ग्रंथालयाची आवस्था वाईट दिसते. अजुनही नागरिकांना सार्वजनिक ग्रंथालयाची माहिती नाही. सार्वजनिक ग्रंथालय फक्त वृत्तपत्रा

पुरतेच बघावयास मिळते. सार्वजनिक ग्रंथालया बददल सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण व्हायला पाहिजे. आपण २३ एप्रिलला जागतिक ग्रंथ दिन म्हणुन साजरा करतो (World Book day) जसे इतर अनेक असे दिवस साजरे करतो तसेच हा ही दिवस साजरा करतो . आणि त्याची आठवण त्या दिवसा पुरतीच मर्यादित राहते. व्हॅलेंटाइन डे ला तरुणाईचा जल्लोष बघण्यासारखा असतो पण २३ एप्रिल हा जागतिक ग्रंथ दिन म्हणुन साजरा केला जातो हे कित्ती जण जाणतात. या दिवशी कित्ती जण पुस्तकांच्या दुकानात आणि ग्रंथालयात गर्दी करताना दिसतात.पुस्तकांची आठवण सतत आपल्याला रहावी म्हणुन, ' मिग्युएल दे केरवान्टेस' स्पेन मधील लेखकाच्या मृत्युची तारीख त्यांच्या सन्मानार्थ जाहीर केली तसेच विलीयम शेक्सपिअरच्या मृत्युची तारीख हीच होती म्हणुन या तारखेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. मराठी पुस्तकांचा वाचक कमी होत चालला आहे असं बोलले जाते. परंतु कॉलेजमध्ये केलेल्या सर्वेमध्ये जास्तीत जास्त पुस्तके ही पु.ल.देशपांडे, चेतन भगत, वि. स. खांडेकर, व. पु. काळे, शिवाजी सावंत, प्र. के. अत्रे, सुधा मुर्ती, साने गुरुजी, विलीयम शेक्सपिअर, जे.के. रॉलींग, डॅन ब्राउन, सिडनी शेल्डन, जेफ्री अर्चर, पाउलो कोयालो, तर शाळांमध्ये शेक्सपिअर, चेतन भगत, जे.के. रॉलींग , सुधा मुर्ती, आर. के. नारायण, केनान डायल, रॉबर्ट बॅलार्ड, यांची जास्तीत , जास्त पुस्तके वाचली जातात असे आढळुन आले. वाचन संस्कृती हरवत चालली आहे अशी भिती सगळयानाच वाटत आहे. शाळेतील २५ मुलांपैकी १३ मुले आणि महाविद्यालयातील ५८ मुलांपैकी ३४ मुले सांगतात आम्ही ई बुक्स वाचतो. तर आजचा तरुण वगपुस्तकामध्ये न रमता आता इंटरनेटकडे जास्त वळलेला दिसतो. संगणक, इंटरनेट, आणि मोबाईल सर्वांनाच जवळचा वाटु लागला आहे. पुस्तकांची जागा इंटरनेट आणि मोबाइलने घेतली नसुन ही फक्त माध्यंम आहेत. माध्यंम जरी बदलली तरी पुस्तकांची जागा ही वाचकांच्या मनातच राहणार आहे. अजुनही पुस्तंक म्हणजे कित्येकांचा जिव्हाळयाचा विषय होता

"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 03, Issue: 02, Mar.-Apr. 2016 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (IIFS) - 0.776

आणि कायमच राहणार. आपल्या कल्पना शक्तीला वाव दयायचा असेल तर वाचन हे समृध्द असायला पाहिजे. विज्ञान आणि तंत्रज्ञाच्या प्रगतीमुळे आता पुस्तकाच्या फारमॅट मध्ये बराच फरक पडला आहे. आता ई बुक्स आपल्याला वाचायला मिळतात शिवाय मोबाईल ई बुक्स सुध्दा बाजारात उपलब्ध आहेत. वाचन संस्कृती जिवंत ठेवण्यास सार्वजनिक ग्रंथालये, शाळेतील ग्रंथालये, महाविद्यालयीन ग्रंथालये, पालक, शिक्षक, यांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे. तसेच शाळा, महाविद्यालयीन, आणि सार्वजनिक ग्रंथालये समृध्द असण्याची गरज आहे. मुलं पुस्तकांपर्यंत येणार नसतील तर पुस्तकं मुलांपर्यंत पोहचली पाहीजेत. मुलांच घडण हे बरचसं त्यांच्या वाचनावर अवलंबुन असते म्हणुन त्यांनी काय वाचायचे हे ठरविले पाहिजे. आज टी. व्ही., केबल, इंटरनेटमुळे वाचन कमी झाले असे आपण म्हणतो पण टी. व्ही.वरही बरेच चॅनेल्स असे आहेत ज्यातुन माहिती मिळते. पण आपण जर फक्त निरर्थक सिरियल्स मग त्या मराठी असोत वा हिंदी बघण्यात आपला वेळ वाया घालवतो त्या पेक्षा दिवसभरात कुठल्या वेळी आणि किती वाचु शकेल हे बघितले पाहिजे. आयुष्य बदलायची आणि आयुष्याच ध्येय दाखवण्याची ताकद पुस्तकामध्ये असते. तसेच काही पुस्तक आपल्याला कृती करायला भाग पाडतात. आयुष्याच ध्येय साध्य करण्यासाठी पुस्तकांसारखे मित्र नाहित. आणि ज्याला स्वतःचा विकास करायचा असेल तर त्याला वाचन गरजेचे आहे. वाचन वाढवायचे असेल तर

सगळयांनी मिळुन प्रयत्न करायला पाहिजे.

१. वाढदिवसाच्या दिवशी पुस्तके भेट देणे.

२. लहान वयातच वाचनाची सवय लावावी आणि वाचनाचे महत्व त्यांना पटवुन दयावे.

३. जास्तीत जास्त पुस्तके शाळा आणि महाविदयालयात मुलांना उपलब्ध करुन दयावीत.

४. शाळेतच ग्रंथालयाची ओळख मुलांना करुन दयावी.

५. 'बुक टॉक' सारखे कार्यक्रम आयोजीत करावे.

६. मित्रांनी त्यांच्या इतर मित्रांना पुस्तके वाचण्यास प्रोत्साहन दयावे.

७. दिवसभरातील अर्धा तास तरी वाचनासाठी दयावा.

८. अवांतर वाचन शाळा आणि महाविदयालयात आवश्यक करावे.

९. पुस्तकांचे प्रर्दशन भरवावे तसेच लेखकांना मार्गदर्शनासाठी बोलवावे.

http://